# सेवक वार्ता नूतन वर्ष विशेषांक

जानेवारी-२०२५ वर्ष -६ अंक- ३

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र

## नूतन वर्ष २०२५ च्या हार्दिक शुभेच्छा

### सेवक संघ महाराष्ट्र ची सन २०२४-२५ ची साधारण वार्षिक सभा पुणे येथे होणार

सेवक संघाची सर्व साधारण वार्षिक सभा दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केली आहे.

ठिकाण - वनभवन पुणे

वृत्तस्थरीय शाखेमधून जे सदस्य या सभेला उपस्थित राहणार आहेत त्यांची नावे कार्यकारी अध्यक्ष यांना दि. ३० जानेवारी पर्यंत कळवावीत, जेणेकरून विश्राम गृह आरक्षण तसेच भोजन व्यवस्था नियोजन करणेत येईल. असे श्री. मदन कुलकर्णी, कार्यकारी अध्यक्ष, सेवक संघ जाहीर केले आहे.

**वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी अजेंडा**

१. सन २०२३ - २४ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाचे वाचन.

2. गतवर्षी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत झालेली चर्चा व ठराव तसेच वर्षभरात झालेली कामे यांचा आढावा.

३. दिवंगतसदस्यांनाआदरांजली.

४. कोलामार्काच्या नक्षलग्रस्त भागातील वन्यजीव ( विशेषतः पक्षांची) छायाचित्रे व माहिती संकलित करून वन्यजीव संरक्षणासाठी हातभार लावत असलेले रोजंदारी कामगार श्री कपिल गुंडावार आणि श्री चौधरी यांचा सत्कार करणे.

५. केंद्रीय कार्यकारिणीकडे जमा निधीचा विनियोग कोणत्या उपक्रमावर करण्यात यावा याबद्दल निर्णय घेणे.

६. वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित राहणारे सह अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष यांचा प्रवास खर्च सेवक संघाने करण्याबाबत निर्णय घेणे.

७. सेवक संघाने वन विभागास काही सेवा विनामूल्य उपलब्ध करून सहकार्य करावे याबाबत चर्चा.

८.श्री.जी.के.निकम व श्री बीआर.छल्लारे,चाळीसगाव यांनी २०२४ घ्या पंढरपूर वारीत वृक्ष लागवड/जल आणि मृद संधारण कामांची जनजागृती केल्याबद्दल सत्कार करुन बक्षिस देणे.

९.सोलापूर-धाराशीव नवीन रेल्वे मार्गासाठी वन्यजीव संवर्धनार्थ Mitigation & Conservation Planतयार करणेच्या कामाचा आढावा.

१०.नवीन कामे शोधण्याबाबत प्रस्ताव व चर्चा.

११. आयत्या वेळी येणारे विषय.

## प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

सेवकची वाटचाल .... नवी आव्हाने

### सामाजिक वनीकरण विभागातील एकिकृत रोप वाटिका कामांचे मूल्यांकन ....

सेवक संघ महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून दिनांक ०५-१२-२०२५ रोजी सन २०२३-२४ मधील सामाजिक वनीकरण विभागातील ४८ एकिकृत रोपवाटिका कामांचे मूल्यांकन करून मुल्यांकनाचा आराखडा सामाजिक वनीकरण पुणे कार्यालयास सादर करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने सामाजिक वनीकरण पुणे यांनी सेवक संघ कळविले की,राज्यातील वन विभागातील, वनविकास महामंडळ प्रदेश विभाग व सामाजिक बनीकरण विभाग) यासाठी एकिकृत रोपवाटिका (Integrated Nursery) स्थापित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार एकूण ४७ एकिकृत रोपवाटिकांना मान्यता मिळालेल्या प्रत्येक जिल्ह्यात निर्मित रोपवाटिकेत वरील सर्व विभागांकडील पुढील रोपे निमितीचे नियोजन हे याच मान्यता प्राप्त रोपवाटिकांमध्ये करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने प्रत्येक एकिकृत रोपवाटिकेमधून दरवर्षी अपेक्षित उत्पन्न वाढविणे निश्चित असून त्यांचे सन २०२४ जिल्ह्यातल्या रोपवाटिकांमध्ये विक्री केलेल्या रोपांची विभागवार आकडेवारी सेवकचे स्तरावरुन आवश्यक तो पडताळणी करून घ्यावी.

तसेच प्राप्त प्रारुप आराखड्यामध्ये एकिकृत रोपवाटिकांच्या मूल्यांकनाचे अनुषंगाने काही खालील उणिवा आहेत. त्यानुसार एकिकृत रोपवाटिकांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

१. निवड करण्यात आलेल्या एकिकृत रोपवाटिकेची जागा ही एकिकृत रोपवाटिकेकरिता योग्य आहे का?

२. दर्जेदार मातृवृक्ष निर्मिती करणेकरिता निवडण्यात आलेले क्षेत्र योग्य व पुरेशे आहे का?

३. पाण्याचा स्त्रोत काय आहे व त्यामध्ये पाणी साठा मुबलक आहे का?

४. रोपवाटिकेमध्ये विद्यमान पायाभूत सुविधा व विजेचा स्त्रोत.

५. जमिनिची स्थिती.

६. सद्यस्थितीत शिल्लक असलेली रोपे व त्यांची स्थिती.


७. सन २०२४ मध्ये लावलेल्या व विक्री करण्यात आलेल्या रोपांचा विभागनिहाय तपशिल सोवत जोडण्यात आलेला आहे. त्यानुसार एकिकृत रोपवाटिकांमध्ये पुढील वर्षामध्ये तयार करण्यात येणाऱ्या रोपांचे नियोजन करता येणे शक्य आहे का?
८. रोपवाटिकांचे सविस्तर प्रकल्प आराखडे तयार आहेत का असल्यास त्यानुसार रोपवाटिकांची कामे करण्यात आली आहेत का? सुरु कामांची गुणवत्ता कशी आहे?
९. वरील नमूद बाबी व्यतीरीक्त आपल्या अनुभवानुसार रोपवाटिका व्यवस्थापनासंबंधी इतर आवश्यक पैलूंची तपासणी करावी.
वरील बाबींचे अनुषंगाने मूल्यांकन करण्यात यावे व त्यानुसार मूल्यांकनाचा सुधारीत प्रारुप आराखडा या कार्यालयास सादर करण्यात यावा.
या कामाचे चमू प्रमुख श्री. संजय जगताप , अमरावती हे वरील मुद्द्यांचे संबंधात अनुपालन करून ३१ जानेवारीपर्यंत अंतिम अहवाल सादर करणार आहेत.

## सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखडा

दि.१२-०१-२०२५ रोजी सोलापूर-धाराशिव रेल्वे मार्गासाठी सेवक संघाने तयार केलेल्या Mitigation & Conservation Plan ला अंतिम स्वरुप देण्यासाठी व्ही.डी.ओ.चर्चासत्र पार पडले.त्यात पुढील व्यक्ती सहभागी होत्या,
१.श्री.बनसोडे,मध्ये रेल्वे
२.श्री.प्रतिक,मध्य रेल्वे सल्लागार
३.श्री.सावरकर,सेवक संघ
४.श्री.पत्की,सेवक संघ
५.श्री.सुतळे,सी.एफ.ए.
सोलापूर-धाराशीव नवीन रेल्वे लाईन करिता Mitigation & Conservation Plan तयार करण्याचे काम पूर्णत्वास गेले असून,वन प्रबोधिनी चंद्रपूर यांनी सदर कामाचे शुल्क अदा केले आहे. मेहनताना शुल्क रकमेचे वितरण करणेत आले आहे.

## श्री. संजय जगताप लिखीत व सेवक संघातर्फे प्रकाशित "वन अपराधांचा तपास, चौकशी आणि न्यायालयीन प्रक्रिया" पुस्तकाची पाचवी आवृती लवकरच प्रकाशित

सदर पुस्तकाची वाटचाल खालीलप्रमाणे राहिली
प्रथम आवृत्ती सन २०१५ - ३००० प्रती
द्वितीय आवृत्ती सन २०१७ - ५००० प्रती
तृतीय आवृत्ती सन २०२०-१००० प्रती
चतुर्थ आवृत्ती सन २०२१ -१००० प्रती आणि
पाचव्या आवृत्तीत सन २०२५ मध्ये -२००० प्रती प्रकाशित करण्यात येत आहेत.




या आवृत्तीतील विशेष बाबी खालीलप्रमाणे होत.
- सन २०२३ मध्ये भारतीय वन अधिनियम मधील "जन विस्वास कायदा" अंतर्गत सुधारणा (de-criminalization of sec. 26& sec 33 .
- वन्यजीव (संरक्षण) अधि.,१९७२ मधील सुधारणा.
- कायदेशीर प्रक्रिया करिता भारतीय नागरिक सुरक्षा अधिनियम २०२३, भारतीय न्याय संहिता २०२३
- भारतीय साक्ष अधिनियम २०२३ मधील सुधारणा सह तपशील देण्यात आला आहे.
- सोबत वन गुन्हे हाताळण्यास प्रशासकीय कार्यप्रणाली, वन्यप्राणी मृत्यू व विल्हेवाट प्रकरणी SOP, गृह मंत्रालय, केंद्र शासनाने, गुन्ह्यातील शोध व जप्ती प्रकरणी नवीन सुधारित कायद्यातील बंधनकारक असलेली प्रक्रिया ची SOP.
- वन गुन्हे संबंधी महत्त्वाचे अद्यावत न्यायालयीन निवाडे इत्यादी माहिती व कायदेशीर प्रक्रिया देण्यात आली आहे. योग्य तपास व कायदेशीर प्रक्रिया पार पाडण्यासाठी, विविध संबंधित अधिसूचना, शासन आदेश, परिपत्रके, वन्य जीव प्रकरणातील पुरावे संकलन प्रक्रिया, विविध स्तरातील वन अधिकाऱ्यांचे कायदेशीर अधिकार देण्यात आल्याने संभ्रम विरहित तपास करणे शक्य होईल अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकाच्या, महाराष्ट्रातील विविध प्रशिक्षण संस्था, वनविभाग व वन अधिकाऱ्यांचे मागणी नुसार

आज पर्यंत १२००० प्रती प्रकाशित करण्यास संधी प्राप्त झाली. सेवक संघ, महाराष्ट्र व महाराष्ट्रातील सर्व वन अधिकारी यांचे लेखक श्री. संजय जगताप यांनी आभार व्यक्त केले आहेत. फेब्रुवारी २०२५ मध्ये सदर पुस्तक पुरवठा करण्यात येईल.

## वन अकादमीमध्ये सेवक संघातर्फे किंवा अन्य कोणाचेही तर्फे पुरस्कृत बक्षिसे किंवा मेडल्स स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

धुळ्यातील मागील वर्षी झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये चंद्रपूर अकादमी आणि कुंडल अकादमी येथे प्रशिक्षण घेत असलेल्या वनक्षेत्रपाल बॅचच्या टॉपरला सेवक संघाच्या वतीने पदक देण्याचे ठरले होते. त्याच्या अनुषंगाने कार्यकारी अध्यक्षांनी सप्टेंबरमध्ये दोन्ही अकादमींना पत्र पाठवले होते. कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने,मी गेल्या आठवड्यात पुन्हा दोन्ही अकादमींना विनंती केली.

त्यावर सेवकतर्फे प्रतिनिधींनी संपर्क साधला असता, संचालक यांनी असे स्पष्ट करून सांगितले की, कुठल्याही वन अकादमीमध्ये सेवक संघातर्फे किंवा अन्य कोणाचेही तर्फे पुरस्कृत कुठल्याही प्रकारची बक्षिसे किंवा मेडल्स स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

यादोंका उजीयाला रहने दो यारों, ना जाने जिंदगिकी शाम कब हो जाये ।

सेवा निवृत्त वन कर्मचारी संघ केंद्रीय कार्यकारणी आणि धुळे वृत कार्यकारणी, धुळे येथील सन २०२४ बैठक फोटो.



*नूतन वर्ष २०२५ च्या सर्व सेवक संघ पदाधिकारी, सदस्य, त्यांचे कुटुंबीय, हितचिंतक,सेवक वार्ताचे वाचक सर्वांना हार्दिक शुभेच्छा*

## सेवानिवृत्त वनाधिकारी रामदास पुजारी यांच्या 'खोल मनाच्या तळाशी' कवितासंग्रहाचे प्रकाशन



"पुजारी यांच्या कविता मनाचा व नात्यांचा शोध घेणाऱ्या यशदाचे अतिरिक्त महासंचालक व लेखक" शेखर गायकवाड यांचे उद्गार

पुणे : "सरकारी नोकरी दीर्घकाळ करूनही ज्यांनी संवेदनशीलता जपली आहे, असे वनाधिकारी रामदास पुजारी यांच्या संवेदनशीलतेचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत दिसते. त्यांच्या कविता म्हणजे मनाचा व नात्यांचा शोध घेणाऱ्या आहेत", असे उद्गार यशदाचे अतिरिक्त महासंचालक आणि लेखक शेखर गायकवाड यांनी येथे काढले.

निमित्त होते निवृत्त वनाधिकारी रामदास पुजारी यांच्या 'खोल मनाच्या तळाशी' या कवितासंग्रहाच्या प्रकाशनाचे. गायकवाड यांच्यासह बालभारतीचे संचालक डॉ. कृष्णकुमार पाटील तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या कवितासंग्रहाचे प्रकाशन वनभवन, गोखलेनगर येथील सभागृहात झाले. निवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. शेषराव पाटील, कवी रामदास पुजारी, साहित्यविश्व प्रकाशनाचे विक्रम शिंदे, पुजारी यांची पत्नी, मुली, बहीण,भाऊ आदी व्यासपीठावर होते. मुख्य वनसंरक्षक (प्रा.)पुणे व कुंडल वनप्रबोधिनीचे महासंचालक एन. आर. प्रवीण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

शेखर गायकवाड म्हणाले, पुजारी यांनी वनविभागातील सरकारी नोकरी करत असताना कवितासंग्रहांचे प्रकाशन करून सरकारी विभागातील रूक्षता स्वतःमध्ये येऊ दिली नाही. गणितासारखा विषय, वनविभागातील जबाबदारी, फिरत्या स्वीकारूनही त्यांनी संवेदनशीलता जपली आहे. सरकारी नोकरीत असणाऱ्या अनेकांनी लिहिते राहिले पाहिजे आणि वेगळे अनुभवविश्व मांडण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे माझे सांगणे आहे. पुजारी यांनी कवितासंग्रहाचे प्रकाशन करून ते सिद्ध केले आहे, हे उल्लेखनीय आहे.

डॉ. कृष्णकुमार पाटील म्हणाले, बालभारती प्रत्येक घरातला घटक आहे. पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार आणि वाचन आदर्श उभे करण्याचा प्रयत्न अभ्यासमंडळे करत

असतात. पुजारी यांच्या कवितेतही संस्कार करण्याचे सामर्थ्य दिसते.

डॉ. शेषराव पाटील म्हणाले, पुजारी यांनी आपल्या कवितांमधून शेतकऱ्यांचे कष्ट मांडले आहेत. तसेच नात्यांविषयी भाष्य केले आहे. त्यांचे भावविश्व उलगडणाऱ्या या कविता आहेत.

पुजारी यांनी निवृत्त झाल्यावर न थांबता दुसरी खेळी जणु सुरू केली आहे. त्यांच्यातील शिक्षक पुन्हा कार्यरत झाला आहे आणि कवितासंग्रहाच्या निमित्ताने कवीही लिहिता झाला आहे, हे विशेष वाटते. त्यांचा हा तिसरा काव्यसंग्रह आहे. त्यांनी यापुढेही लिहीत राहावे, अशा शब्दांत एन. आर. प्रवीण यांनी अध्यक्षीय समारोप केला.

मनोगत मांडताना कवी रामदास पुजारी यांनी आपली जडणघडण, संस्कार करणारे गुरूजन, कुटुंबीय, स्नेही आणि संघर्षाचे दिवस उलगडले. आई, वडील, गुरू हे श्रद्धेचे तर शेतकरी, निसर्ग, वृक्ष हे सारे जिव्हाळ्याचे विषय आहेत. नात्यांविषयीचे कुतूहल जागे असल्याने नात्याविषयीच्या कविता लिहिल्या गेल्या तर काही कविता प्रसंगानुरूप सुचत गेल्या, असे ते म्हणाले.

साहित्यविश्व प्रकाशनाचे विक्रम शिंदे यांनी आभार मानले तर अनिता देशपांडे व सुनीता पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

-विक्रम मालन आप्पासो शिंदे
साहित्यविश्व प्रकाशन, पुणे.

———•□❂□•□———

## खूप उपयुक्त !!

"वृद्धांमध्ये मानसिक गोंधळाची कारणे कोणती?"
सर्वात सामान्य कारण सूचीबद्ध केले ते म्हणजे

## निर्जलीकरण

हे विनोदी वाटेल; पण ते खरे आहे.

60 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांना तहान लागणे बंद होते आणि परिणामी, द्रव पदार्थ पिणे थांबवतात .

आणि त्यांना द्रव पदार्थ सेवनाची आठवण करून देण्यासाठी आजूबाजूला कोणीही नसते तेव्हा ते लवकर निर्जलीकृत होतात.

निर्जलीकरण गंभीर आहे आणि संपूर्ण शरीरावर परिणाम करते. यामुळे अचानक मानसिक गोंधळ, रक्तदाब कमी होणे, हृदयाची धडधड वाढणे, एनजाइना (छातीत दुखणे), कोमा आणि मृत्यू देखील ओढवू शकतो.

द्रव पिणे विसरण्याची ही सवय वयाच्या ६० व्या वर्षी सुरू होते, जेव्हा आपल्या शरीरात ५०% पेक्षा जास्त पाणी असते.

६० वर्षांवरील लोकांकडे पाण्याचा साठा कमी असतो. हा नैसर्गिक वृद्धत्व प्रक्रियेचा भाग आहे.

त्यात आणखी गुंतागुंत अशी की, जरी ते निर्जलित असले तरी, त्यांना पाणी प्यावेसे वाटत नाही, कारण त्यांची अंतर्गत संतुलन यंत्रणा फारशी काम करत नाही.

### निष्कर्ष:

६० वर्षांहून अधिक वयाचे लोक सहजपणे निर्जली कृत होतात, इतकेच नव्हे तर त्यांना शरीरात पाण्याची कमतरता आहे हे जाणवत नाही.

जरी ६० वर्षांपेक्षा जास्त लोक निरोगी दिसत असले तरी, प्रतिक्रिया आणि रासायनिक कार्ये त्यांच्या संपूर्ण शरीराला हानी पोहोचवू शकतात.

म्हणून येथे दोन सूचना कराव्या शा वाटतात:

१) द्रव पदार्थ सेवनाची सवय लावा. द्रवपदार्थांमध्ये पाणी, रस, चहा, नारळाचे पाणी, सूप आणि टरबूज, खरबूज, पीच आणि अननस यांसारखी पाणी समृद्ध फळे यांचा समावेश होतो; ऑरेंज आणि टेंजेरिन पण हे काम करतात.

महत्त्वाची गोष्ट अशी की, दर दोन तासांनी तुम्ही काही द्रव पदार्थ सेवन करावे.

हे लक्षात ठेवा !

२) कुटुंबातील सदस्यांसाठी इशारा: 60 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांना सतत द्रव पदार्थ द्या.

ते जेव्हा द्रवपदार्थ नाकारतात आणि तशा दिवसात चिडचिड करतात, अस्वस्थ दिसतात, ती निश्चितच त्यांच्या निर्जलीकरणाची लक्षणे आहेत.

तेव्हा ज्येष्ठांनी जास्तीतजास्त पाणी प्यावे
ही माहिती इतरांना पाठवावी.

🕊 🕊 🕊 🕊 🕊 🕊 🕊 🕊 🕊

हृदयस्पर्शी....

## "परतफेड"

"कसे आहात..??"

एवढा एकच प्रश्न तिने विचारला.., आणि रोज दिसणाऱ्या पण जास्त परिचय नसणाऱ्या त्या बाईसमोर मी मनसोक्त रडलो..

ती म्हणाली.. "भरपूर रडून घ्या.. मला वेळ आहे. आजच रडायचं आणि नंतर कधी सुध्दा डोळ्यांतून पाणी काढायचं नाही.."

त्या नंतर तिने जे काही सांगितलं.. त्या मुळे माझा अंतरबाह्य असा कायापालट झाला..!

"तिनं काय सांगितलं..??"

ती शांतपणे म्हणाली.. "की आपण हा जो मनुष्य जन्म घेतलाय, तो आपल्या अपेक्षांपूर्ती करिता नाही किंवा नसावा.. कारण आयुष्यात आपण नेहमी दुसऱ्यांकडूनच अपेक्षा ठेवत असतो आणि बऱ्याचदा त्या पूर्ण होत नाहीत.. त्या मुळे उरतात त्या फक्त जाळणाऱ्या व्यथा..!"

"माझ्या मते हा जन्म आपल्या अपेक्षांपूर्ती करिता नाहीच आहे, तर हा आहे कुठे तरी, केव्हा तरी राहुन गेलेल्या दुसऱ्यांच्या परतफेडीसाठी..."
जसं तुमच्या सौभाग्यवती गेल्या, तुम्ही त्यांचा संसार पूर्ण केलात, तुम्ही त्यांचा संसार पूर्ण करण्याकरिता हा जन्म घेतला, ह्याचा अर्थ कोणत्यातरी एका जन्माची परतफेड तुमच्या कडुन झाली.. तो अकाउंट तुमचा संपला..! आता

ह्याच दृष्टिकोनातून आयुष्यातील सगळ्या लहान मोठ्या घटनांकडे पाहण्याचा प्रयत्न करा..,
मुलगा आणि सून तुमच्याशी बोलत नाहीत.. ही सुध्दा तुम्ही कोणतीतरी परतफेड करत आहात.. परतफेडीचा हा हिशोब ह्या जन्मात संपवल्याशिवाय तुम्हांला मरण नाही... तेंव्हा मनातल्या मनांत सुद्धा परमेश्वराला उद्देशून "तु मला का जगवलंस..?" हा प्रश्न विचारू नका..
कुठलीही व्यक्ती असो ती तुमच्याशी विचित्र वागली.. तुमचा अपमान केला.. तुमच्या कडे दुर्लक्ष केलं.. तुमच्या उपकरांचं कोणाला विस्मरण झालं.. "तेव्हा एकेक अकाउंट पूर्ण झाला असे समजा, आणि तसं आजपासून स्वतःला सांगायला लागा..

बँकेतली शिल्लक संपली की पासबुकावर, 'Account Closed..' असा शिक्का मारतात ना..., त्याप्रमाणे जेंव्हा एकांत मिळेल तेंव्हा आपले किती 'Account Closed' झाले, ह्याचा विचार करा आणि पासबुकं जाळून टाका.. परतफेडीचा एक ही क्षण टाळू नका...
कदाचित सुरुवातीला तुम्हांला जड जाईल.. पण आपलं मन जेवढं बलदंड असतं ना, तेवढंच ते लवचिक पण असतं..
तेंव्हा मनाला सांगा. "बाबा रे.. आयुष्यभर तुझं ऐकलं.. तुझ्या हुकमात राहिलो.. आता तुझी गुलामी मी सोडून देत आहे.. आजपासून तुला मी मुक्त केलं..!"
हा प्रयोग करा... आणि किती खाती पटापट बंद होतायेत ह्याची प्रचिती घ्या.. मी सुद्धा उद्या तुम्हांला ओळख दाखवली नाही.. तर तुमच्या पासबुकात माझी एकच entry होती असं समजा..

परमेश्वराला दोष देण्यापेक्षा फक्त.. "परतफेड आणि परतफेड" हा एकच मंत्र ध्यानात ठेवा आणि बघा तुम्हाला तुमचे आयुष्य किती सुंदर वाटेल, तुमच्या आयुष्यातुन निगेटीव्हीटी कायमची निघुन जाईल.....
आणि मी येते... असं म्हणत ती निघून गेली..
इतकं सगळं बोलून गजा उठला आणि म्हणाला..,
" आज ही मुक्ती मिळून पाच वर्षं झाली.. मी आयुष्य खुपच मस्त जगत आहे.. तृप्त आहे.." "तुम्ही सहन करतो, सहन करतो.." हे इतक्या वेळा सांगितलंत, ह्याचा अर्थ तुम्ही काहीच सहन करत नाहीत.. तुम्ही फक्त दुःख वाटत असतात.."

"जो सहन करतो ना.. तो कधी बोलत नाही..!"
चला तर मित्रांनो, आज पासुन आपण सुध्दा आपल्या आयुष्यात कोणा कडुन अपेक्षाभंग करुन घेण्या ऐवजी फक्त "परतफेडीचं" आयुष्य जगायला सुरुवात करुन आयुष्य मजेत घालवुया..
एक छोटासा प्रयत्न...
माझ्या कडून......

ᘐᘐᘐᘐᘐ❁ᘐᘐᘐᘐᘐ

## विशेष लेख.....

## माझ्या वन सेवेतील प्रारंभिक आठवणी--

-विठ्ठल त्र्यंबक पत्की

इंडीयन फॉरेस्ट कॉलेज,डेहराडून येथून मार्च १९६७ अखेरीस वानिकी पदविका उत्तीर्ण केल्यानंतर, माझी परिविक्षाधीन सहायक वन संरक्षक पदावर आलापल्ली वन विभागात पदस्थापना झाली.

१-१०-१९६७ ते ३१-०५-१९६८ या कालावधीत मी लग्गाम वनपरिक्षेत्र, स्थित चौडमपल्ली येथे वन क्षेत्रपाल पदावर कार्यरत होतो. त्या काळातील माझ्या मनावर ठसा उमटविणाऱ्या आठवणी मी कथन करीत आहे.

माझेकडे श्री. डी. व्ही. रामटेके नांवाचे डेप्युटी रेंजर कार्यरत होते. त्यावेळी त्यांचे वय सुमारे ५० वर्ष होते. एके दिवसी त्यांनी एका वन अपराध्यास पकडून माझेकडे देऊन आले व त्यांचे काय करावयाचे याबाबत मार्गदर्शन मागू लागले. त्या व्यक्तीचा अपराध होता की, राखीव वनातील नाल्यावर तो मासेमारी करित होता. तीन ते चार इंच लांबीचे व करंगळीच्या जाडीचे पाच मासे आरोपींकडून जप्त केले होते.

गुन्ह्याची तडजोड करावी की नाही यांचेवर चर्चा सुरू झाली. आरोपी आदिवासी व अत्यंत गरीब व तडजोडी साठी तो तयार नव्हता; कारण त्यांचेकडे रक्कम नव्हती, परंतु गुन्हा मात्र त्यास मान्य होता.
"साहेब, घरी बायका पोरांना खायला काही नव्हते म्हणून मासेमारी साठी गेलो होतो" अशी अत्यंत केविलवाणेपणे तो विनवणी करत होता. या पाच मास्यांची किंमत किती होईल अशी विचारणा मी श्री. रामटेके यांना केली. "१-२ आणे होईल" असे उत्तर मिळाले. ठीक आहे, ही किंमत मी देतो. तुम्ही तडजोड करा " अशा सूचना मी दिल्या. दोन आणे मी दिले व पाच मासे घेऊन आरोपी आनंदाने घरी निघाला. जातांना

त्याने माझे चरणास वंदन केले. ते वंदन अजूनही मी विसरलो नाही. त्याचे आशिर्वाद माझे आजही कल्याण करीत आहेत.

दुसरा प्रसंग आहे, मला हाताखालील कर्मचा-यांचे बरोबर कसे वर्तन करावयाचे यांचा धडा देणारा होता. चौडमपल्ली ते रेंगेवाही रस्त्याचे काम सुरु होते. त्याची माहिती देण्यासाठी रेंगेवाहीचे दफेदार (वनपाल) सायकलवरून चौडमपल्लीस सुमारे ११.३० चे सुमारास आले होते. प्रसंग ऑक्टोबर महिन्याचे तिस-या आठवड्यातील होता. रेंजरचे खुर्चीवर मला पाहून, दफेदार अचंबित झाले. दफेदाराचा गोंधळ श्री. जे.बी. भुते, वनक्षेत्रपाल यांच्या चाणाक्ष बुध्दीने ओळखला. त्यांनी दफेदारास सूचना दिल्या की "ये नये छोटेसाब रेंज चार्जमे है, उनको सलामी दो". दफेदारांनी मला सलामी दिल्यानंतर, श्री. भुते मला म्हणाले, "सर, मी यांना घरी नेऊन चहापाणी करून पंधरा मिनीटात घेऊन येतो". दफेदार सुमारे ५५ वयाचे होते व उन्हात सायकलवरुन आल्यामुळे घामाने चिंब झाले होते. मी होकार दिल्यावर, दोघेही घरी जाऊन फ्रेश झाले व बरोबर १५ मिनीटात परत आले. प्रत्येक प्रसंगात हातात खालील कर्मचा-यांनी असे वर्तन करावे याचा धडा मी श्री. भुते यांचेकडून शिकलो.

आणखीन अशा अनेक विलक्षण आठवणी आहेत, ज्यांनी मला घडविले.सुदैवाने मला बिघडविणा-या आठवणींचा संच माझेकडे नाही, ही ईश्वरी कृपाच आहे.

••◈•• ••◈••

## जंगलातली मंगला

-मिलींद पंडीतराव

सन 1995 मध्ये कोकणातील कडावल (ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग) वरून माझी बदली परिक्षेत्र वन अधिकारी गगनबावडा (जि. कोल्हापूर) या पदावर झाली आणि घरातले सर्व खुश झाले. कारण मुख्यालय साळवण हे कोल्हापूरपासून जवळ म्हणजे 30 कि. मी. वर होते. कोल्हापुरातील बंगल्याचे काम जवळ जवळ पुर्ण होत आले होते. त्यामुळे चांगल्या शाळेत मुलांना प्रवेश मिळाला की निवास व शिक्षण हे प्रश्न मिटल्यात जमा होते. माझ्यासाठी साळवणला निवासस्थान होतेच.

साळवणला हजर झालो आणि नेहमीच्या कामापेक्षा एक वेगळाच प्रश्न उदभवला.. साळवण मुख्यालयात एक मादी गवा (Bos gaurus) ठेवण्यात आला होता. ठेवण्यात आला होता म्हणण्यापेक्षा पाळण्यात आला होता म्हणणे योग्य राहील. तिला जंगलात सोडण्याची परवानगी मागण्यात आली आहे परंतु अद्याप मिळालेली नाही असे समजले. 3/4 वर्षांपूर्वी गगन बावड्यात गुरांच्या चराईच्या कळपातून ते 3/4 महिन्याचे पिल्लू कोणा गुराख्याच्या घरी आले. प्रामाणिकपणे त्याने ते पिल्लू वन विभागाकडे हस्तांतरीत केले. पुन्हां त्वरित जंगलात सोडणे अनेक कारणांनी योग्य नसल्याने, काळजी घेण्यास उपलब्ध मनुष्यबळ व उपलब्ध जागा विचारात घेऊन त्यास साळवण येथे ठेवण्यात आले. या मादी पिल्लूला रोज चारा, पाणी देऊन, वेळोवेळी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यास दाखवून फार प्रेमाने ठेवले होते. सुरवातीला मलाही विशेष काही वाटले नाही. म्हैस पाळायचा अनुभव असल्याने, बघू, गव्याचाही अनुभव घेऊ/आयता अभ्यासाला उपलब्ध झाला आहे असा माझा विचार होता. रोज जाऊन तिच्या अंगावरून हात फिरवणे, चाऱ्याची पेंढी घालणे असे माझे तिच्याशी जवळीक साधण्याचे उद्योग चालू होते. कर्मचाऱ्यांनी तिचे नाव मंगला ठेवले होते आणि मीही याच नावाने तिला हाक मारत असे.

गव्याची दृष्टी थोडी कमी असते परंतु घ्राणेंद्रिये तीक्ष्ण असतात असे वाचले होते आणि हे खरे आहे असे सहवासाने पक्के झाले. दुसरे म्हणजे रस्त्याने जाणारे अनेक जण कुटुंबाला दाखवण्यासाठी/ स्वतः पाहण्यासाठी तिच्या गोठ्यात आमची परवानगी घेऊन आमच्या माणसासोबत जातं व पोट भरून पाहून घेत. परंतु हे शांत जनावर कोणाच्याही कधी अंगावर गेले नाही. लोकच भीतीने थोडे लांब रहात (छोटा बाळू व मोठा बाळू हे तिची देखरेख करणारे मजुर, मी आणि पशु वैद्यकीय अधिकारी सोडून).

आणि निसर्ग न्यायाने अचानक एके दिवशी बाका प्रसंग उदभवला आणि तो नंतर तिला राधानगरी अभयारण्यात सोडेपर्यंत प्रत्येक महिन्याला उदभवत राहिला.

सकाळी 9/9.15ची वेळ आणि अचानक माझ्या निवासस्थानासमोरच्या रस्त्यावरून (कोल्हापूर - गगनबावडा विजयदुर्ग राज्यरस्ता ) लोकांचा "गवा " "गवा ", पळा पळा, पकडा पकडा "असा दंगा ऐकू येऊ लागला. बाहेर येऊन पहातो रस्त्यावर मंगला मॅडम उभ्या आहेत. दोन्ही बाजूला वाहने उभी राहण्यास सुरवात झाली आहे आणि दोन्ही बाजूने माणसे आरडाओरडा करत आहेत. तिला देखरेख करणारा मोठा बाळू तिला लांबूनच आ आ करून शांत करायचा प्रयत्न करत आहे असे दृश्य दिसले. आमचे 10/12 कर्मचारीही थोड्याच वेळात तेथे उपस्थित झाले. पशु वैद्यकीय अधिकार्यांना फोन केला तर ते भागात

(कार्यक्षेत्रातील दौऱ्याला बोली भाषेतील शब्द) गेल्याचे समजले. त्यावेळी मोबाईल नव्हते (व तसेही अनेक वनक्षेत्रात सध्याही रेंज नसल्याने संपर्क होईलच असे नाही). सगळेच जण चर्चा करू लागलो. त्यात नेहमीप्रमाणे आयुष्यात पहिल्यांदा गवा पाहणारे परंतु वनातले फार काही कळते अशा थाटातले नुकतेच वाहनातून उतरलेले उत्साही दीड शहाणेही होते. दुसरीकडे काही लोकांना हॉर्न वाजवू नका म्हणून सांगूनही काही लोकांचे गाडीत बसून हॉर्न वाजवणे चालू होते. मंगलाने गळ्यातला दावा तोडून रस्त्यावर धाव घेतल्याने तिच्यावर सरळ नियंत्रण मिळवणे अवघड झाले होते. भरीला वाढता गोंगाट. पण आम्ही काही ओळखीचे चेहरे तिला दिसत असल्याने मंगला कोणाच्या अंगावर न जाता रस्त्यातच येरझाऱ्या घालत होती.

आजूबाजूच्या शेतातील जनावरांचे 2/3 कासरे आमच्या कर्मचाऱ्यांनी तो पर्यंत पैदा केले व ते एकत्र करून आम्ही एक मोठा कासरा तयार केला आणि एक कासरा दोर म्हणून राखून ठेवला. एक कर्मचारी तयार केलेला मोठा कासरा घेऊन मंगलाजवळच्या रस्त्याकडेच्या झाडावर चढला. इतर कर्मचाऱ्यांनी बघ्यांना शक्य तितके दूर केले. मी समोरून व छोटा बाळू व मोठा बाळू दोन्ही बाजूने मंगलाला चुचकारत जवळ जाऊ लागलों. तिला हुंदडायला सर्व दिशा मोकळ्याच होत्या. परंतु आमचे ओळखीचे चेहरे जवळ येताना पाहून आणि गलका थोडा शांत झाल्याने ती एका जागी उभारली व आम्ही तिघांनी आम्हाला हव्या त्या झाडाकडे नेले. झाडावरील व्यक्तीने वरून कासऱ्याचे फासके खाली टाकताच मोठ्या बाळूने ते शिताफीने तिच्या शिंगांवरून गळ्यात सरकावले. लगेच दुसऱ्या बाजूने दोर लावून उत्सव मूर्तीला सावकाश गोठ्याकडे न्यायला सुरवात केली. रस्ता ओलांडताच तिला आम्ही लगेच पाणी पाजले आणि गोठ्यात रवानगी करून वाहतूक चालू करून दिली. या सगळ्यात सुमारे 1.5 तास गेला होता आणि प्रवाशांना विलंब झाल्याने आमच्या पदरी भरपूर शिव्या गोळा झाल्या होत्या. सुदैवाने तिने कोणालाही जखमी केले नाही.

झालेला अनुभव विचारात घेऊन तिच्या मागच्या 2 पायानाही सैलसर दोर व पुढील कासऱ्यालाही जादा दोर लावण्यात आले. गोठ्याला दरवाजा बसवण्यात आला.

सायंकाळी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिची तपासणी केली आणि मला म्हणाले "तुमची लेक आता वयात आली आहे, लवकर मोठ्या जंगलात गव्यांच्या कळपात सोडून द्या". दुपारीही मोठ्या बाळुनेही तेच सांगितले होते. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तसा दाखला दिला व मी विहित मार्गाने तसा अहवाल मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांचेकडे पाठवला व त्यात तिला राधानगरी अभयारण्यात सोडण्याची परवानगी मागितली. ही परवानगी यायला 3 महिने गेले (त्या वेळी इ मेल/संगणक नव्हते तसेच वरिष्ठानी कोणी प्राणी संग्रहालय तिला स्वीकारेल का याचीही चाचपणी केली होती ) आणि दरम्यानच्या काळात मंगलाने रस्ता बंद करण्याचा तिचा उपक्रम 3 वेळा पार पाडला. सुदैवाने पावसाळा असल्याने रहदारी कमी राहिली, आमची देखरेख, बाजूच्या शेतकऱ्यांचे सहकार्य व आमचा एकूणच वाढलेला सराव यामुळे कोणतीही दुर्घटना घडली नाही.

एके दिवशी अपेक्षित परवानगी मिळाली. मी पूर्वी दाजीपूर अभयारण्यात काम केले होते तरी पुन्हां एकदा दाजीपूर येथे जाऊन तिथल्या अधिनस्थ अधिकाऱ्यांसोबत सांबरकोंड या ठिकाणची पाहणी करून, ट्रक त्या ठिकाणापर्यंत जाईल याची खात्री करून आलो. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला गुंगीचे औषधं देण्याचे व पुर्ण प्रवासात बरोबर येण्याचे परतपरत विनंती केल्यावर मान्य केले. तिला पायात दोरी टाकून पाय बांधणे आवश्यक होते तरच इंजेक्शन डोस पुरेसा व तिला इजा न करता देणे शक्य होते. त्यासाठी नालबंद (बैलांच्या पायात नाला मारणारा ) शोधला.

त्यानंतर ट्रक निश्चित केला. त्याला सोबत पायाडे आणण्यास सांगितले. वरिष्ठ कार्यालयाकडून जीप मागून घेतली. त्यावेळी परिक्षेत्र अधिकार्याकडे जीप्स नव्हत्या. ही सगळी पूर्वतयारी झाल्यावर एके दिवशी सकाळी ८ वाजता कर्मचाऱ्यांसह जाणेचे ठरले. त्याप्रमाणे दाजीपूर येथे कल्पना दिली.

ठरल्याप्रमाणे सकाळी ८ वाजता पशु वैद्यकीय अधिकारी, नालबंद, इतर कर्मचारी, ट्रक उपस्थित झाले. नालबंदने त्याच्या पद्धतीने मंगलाला दोर टाकून पाय जवळ घेऊन पाडले. पशु वैद्यकीय अधिकाऱ्यानी तिच्या पार्श्वभागावर गुंगीच्या औषधाचा डोस इंजेक्ट केला तो सुमारे 4 तास म्हणजे कोल्हापूर

- राधानगरीमार्गे दाजीपूरला पोहोचेपर्यंत टिकला असता. पुन्हां मंगलाला उभे करून ट्रकमध्ये पायाडाने चालवत चढवले. गुंगीच्या अमंलाखाली व ओळखीचे कर्मचारी असल्याने तिने काही त्रास दिला नाही. नालबंद, छोटा बाळू व मोठा बाळू असे तिघेजण तिच्याबरोबरच ट्रकच्या हौद्यात उभे राहिले. ट्रक बंद हूडचा होता. पशु वैद्यकीय अधिकारी, मी व इतर कर्मचारी जीपमध्ये बसलो व प्रवास सुरु झाला.

कोल्हापूर जवळ आले आणि बालिंगा ते वाशीनाका रिंग रोड काही दुरुस्तीसाठी बंद असल्याचे समजले. हरकत नाही. चला रंकाळा तलावमार्गे जाऊ असा विचार करून पुढे आलो तर परताळ्याला पाणी असल्याने (रंकाळ्याला पाणी पुरवठा करणारा मुख्य ओढा /पाणलोट ) तो मार्ग बंद होता. आता रंकाळा चौपाटीमार्गे शहरातून जाण्याशिवाय पर्याय नव्हता. अंतर, रहदारी व त्यामुळे वेळ सर्वच वाढत चालले होते.

शालिनी पॅलेसपाशी (रंकाळा चौपाटी चालू होते तो पॉईंट) ट्रक आला आणि उभाच राहिला. छोटा बाळू ट्रकातून उतरला व जीपपाशी येऊन मला म्हणाला "साहेब, अंमळ गुंगी उतरायला लागलीया, डोक्याकडून हालचाल चालू केलीया आणि पाय नाचवतीया". मी पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे पाहिले, ते म्हणाले "आपण दुसरा डोस देऊन टाकू, गव्याला डोस द्यायची माझी पहिलीच वेळ असल्याने जरा मात्रा कमीच दिली होती". (तशीही पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष वन्यप्राणी हाताळण्याची संधी दुर्मिळच, तसेच डोस जादा होऊन जर प्राणी दगावला तरी अवघडच).

तेव्हढयात मोठा बाळू उतरला आणि म्हणाला "वाईच लवकर चला, ट्रकात परत काय गव्याला आडवा पाडता येणार नाही, पण मी आणि नालाबंद तिला बरोबर पकडून धरतो. डोस तेव्हढा लवकर द्या."

कितीही लवकर डोस द्यायचा म्हटले तरी किमान अंमल चढायला लागेस्तोवर किमान 15 मिनिटे जाणार होती. आणि, तेव्हढ्या वेळात जर दावं तोडून जर मंगलाने खाली उडी मारली तर........

सकाळी १०.०० ची वेळ, कार्यालये/ शाळा/ महाविद्यालय यांना जाण्याची वेळ, रस्त्यावर पुरेपूर गर्दी. कोणती परिस्थिती उद्भवू शकेल याचा अंदाज लगेच आला. ही बाई जराशी जरी ट्रकातून नुसती उडी मारून उभी राहिली तरी हाहाकार माजला असता. मदतीला कोण यायचे तेव्हाच आले असते पण हलगर्जीपणा म्हणून आम्ही सगळेच चौकशीपुरते का होईना निलंबित झालो असतो. शिवाय डिपार्टमेंटविरुद्ध वृत्तपत्रांना एक कायमचे कोलीत मिळाले असते.

मी जीपमधल्या कर्मचाऱ्यांना ट्रकच्या परिसरातील दोन्ही बाजुची वाहतूक थांबवण्याच्या सुचना दिल्या. कर्मचारी पुरेसे व गणवेशातील असल्याने ते शक्य झाले. ट्रक बंद पडला आहे व कोणीतरी VIP जाणार आहे एव्हढेच सांगत रहा असे कर्मचाऱ्यांना सांगितले. ट्रकमध्ये गवा आहे असे जर लोकांना समजले असते तरी ट्रकच्या भोवतीने जमाव जमला असता आणि तो आम्हाला आवरला नसता.

ट्रकच्या आजूबाजू रिकाम्या होताच नालबंद आणि छोटा बाळूने मंगलाला पुढील बाजूने कवेत घेऊन दाबून धरले आणि पशु वैद्यकीय अधिकाऱ्याने चटकन इंजेकशन दुसऱ्या पार्श्व भागावर घुसवले. मंगलाने जरा धडपड केली पण 3/4 मिनिटांनी ती शांत उभी राहिली. सुमारे 15 मिनिटे अंमल पुर्ण चढेपर्यंत तेथेच थांबलो. या सगळ्या प्रकारात कोल्हापूर शहराची हद्द संपेपर्यंत मी पक्का गॅसवर होतो म्हटले तरी चालेल आणि राधानगरी धरण ओलांडल्यावरच निश्वास सोडला.

नंतर संथगतीने दाजीपूर येथे पोहोचून, गुंगी उतरल्यावर चारा व पाणी पाजून निर्धारित ठिकाणी मंगलाची कायमची मुक्तता केली. नंतरही काही दिवस ती एकटी फिरताना तेथील कर्मचाऱ्यांना दिसली परंतु नंतर तिला एका कळपाने सामावून घेतल्याचे निदर्शनास आल्यावर आम्ही तिचा पाठपुरावा सोडून दिला.

अशा या मंगलाबाई भेटल्या हौत्या !!

---

## जीवाश्म (Fossil)

- पी. के. कुलकर्णी

आधुनिक परिभाषेनुसार खडकांतील सजीवांच्या अवशेषास जीवाश्म म्हणतात. त्यांचा अभ्यास पुराजीव शास्त्र (Paleontology) म्हणून ओळखला जातो. जीवाश्म हे वनस्पति व प्राणी या सजीवांपासून बनतात. या पुराजीव शास्त्राच्या अभ्यासासाठी वनस्पती व प्राणी शास्त्र यांची माहिती असणे जरुरीचे असते. प्रामुख्याने जीवाश्म संशोधनासाठी त्या अवशेषांचा काळ कमीतकमी १०,००० वर्षापूर्वीचा


असला पाहिजे असा सर्व साधारण वैज्ञानिक संकेत आहे. त्यामुळे नुकत्याच मृत झालेल्या सजीवांना जीवाश्म म्हणता येणार नाही.

महाराष्ट्रात विदर्भ व कोकण किनारपट्टीत जीवाश्म आढळतात. कोकण किनारपट्टीवर आढळणारा करळ (यात शंख,शिंपले, वाळू असते. ) हा चुनखडक याचेच उदाहरण आहे. विदर्भातील गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यात काष्ठ व पर्ण जीवाश्म आढळून येतात. वन विकास महामंडळातील कन्हारगाव वनक्षेत्रात आढळणारे काष्ठ (Petrified wood ) व पानांचे ठसे (Leaf impression) हे जीवाश्म प्रसिद्ध आहेत.

नुकतेच सिरोंचा वन विभागातील वडधम येथील Fossil Park ला श्री. पल्की सरांच्या समवेत भेट दिली. या पार्कमध्ये काष्ठ,पर्ण, तसेच जलचर प्राणी मासा यांचे विविध जीवाश्म नमुने ठेवण्यात आले आहेत.



मासा प्रकारातील जीवाश्म आकर्षक असून पाहण्यासारखे आहेत. काष्ठ प्रकारातील जीवाश्म पाहून प्राचीन काळातील महाकाय वृक्षांची कल्पना करता येते. सर्व जीवाश्म योग्य प्रकारे जतन करण्यात आले असून उपयुक्त माहितीही देण्यात आली आहे. आजच्या नवीन पिढीतील मुलांच्या ज्ञानात त्यामुळे नक्कीच भर पडेल. वन विभागाचा हा उपक्रम स्तुत्य आहे !!





सिरोंचा पासून साधारण ४० किमी अंतरावर हे पार्क असून अर्ध्या तासात या ठिकाणी पोहचता येते. सिरोंचा पासूनच जवळच असलेल्या शंकराच्या प्रसिद्ध कालेश्वर मंदिरास ही आवर्जून भेट द्यावी. दक्षिणेतील काशी म्हणून हे मंदिर सर्वश्रुत आहे. देशाच्या विविध कानकोपऱ्यातून आलेल्या भाविकांमुळे हे मंदिर सतत गजबलेले असते.

महाराष्ट्र आणि आदिलाबाद प्रांताला लागून असलेल्या तेलंगणा प्रांतातील करीमनगर जिल्ह्यातील

एक महत्त्वाचे धार्मिक शहर. येथे मुख्य देवता म्हणून भगवान शिव आहे. एकाच तळामध्ये २ शिवलिंगे आहेत ज्यामध्ये एक शिव आहे आणि दुसरा यम (मृत्यूचा देव) आहे. या दोन लिंगांमुळे मंदिराला कालेश्वर-मुक्तेश्वर मंदिर असे संबोधले जाते.
ह्या मंदिराच्या ठिकाणी आहे २ नद्यांचा प्रेक्षणीय संगम आहे. एक तेलंगणातील गोदावरी आणि दुसरी महाराष्ट्रातील प्राणहिता. तिसरी नदी सरस्वती जी त्या दोन्ही नद्यांच्या खाली वाहते असे मानले जाते. पावसाळ्यातही बहुतांश पाणी प्राणहिता नदीतून येते.



## नवीन आजीवन सदस्य



श्री. किसन मानसिंग जाधव, सेनि वनपाल, चाळीसगाव, यांनी या महिन्यात धुळे शाखेत आजीवन सदस्यत्व स्विकृत केले.पूर्वी ते साधारण होते. त्यांचे सेवक परिवारात हार्दिक स्वागत.

## निधन वार्ता

१/-श्री केसरी एम.पी. सेवानिवृत्त विभागीय वनाधिकारी यांचे दि ०१/०१/२०२५: रोजी सकाळी ९.०० वाजता, छ. संभाजीनगर येथील अलंकार हौसिंग सोसायटीमध्ये रहात्या घरी वार्धक्याने निधन झाले. त्यांचे वय ८५ वर्षे होते.
एक मेहनती वनाधि कारी म्हणून ते प्रख्यात होते. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो. सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

२. श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण कांबळे, सेवानिवृत्त विभागीय वनाधिकारी यांचे दि. २३/०१/२०२५रोजी दुपारी ३.३० वाजता सहकारनगर, चंद्रपूर येथे अल्पशा आजाराने निधन झाले.

३ श्री. विजयकुमार बाळासाहेब सूर्यवंशी सेवानिवृत्त वन संरक्षक यांचेदि. १९ जानेवारी २०२५ रोजी बंगळुरूमध्ये रात्री निधन झाले. बाराव्या दिवसाचे विधी दि. ३० जानेवारी २०२५ रोजी बेंगळुरूमध्ये असतील. असे त्यांची कन्या कल्याणी विजयकुमार सूर्यवंशी यांनी कळविले आहे.

२/- कै. आष्टेकर यांचा अंत्यविधी दि. २८-१२-२०२४ रोजी झाला. चुकून २८-१२-२०२५ छापले गेलेआहे. त्याबद्दल दिलगिर आहोत.

## वाचक प्रतिक्रिया

## सेवक वार्ता,नोव्हेंबर-२०२४

- डिसेंबर,२०२४ चा सेवक वार्ता अंक नेहमी प्रमाणे परिपूर्ण व सर्वांगीण झाला आहे. श्री.गवळी साहेबांचे संकलन,संपादन अप्रतिम आहे.त्यांना नवीन वर्ष २०२५ च्या सर्व शुभेच्छा.
  -व्ही. टी. पत्की
- अतिशय वाचनीय व सर्वोत्कृष्ट सेवक वार्ता अंक. गवळी साहेब धन्यवाद. – वसंत जोशी
- नेहमी प्रमाणे वाचनीय अंक. प्रत्येक नवीन अंक उत्कंठा वर्धक होत आहे. अभिनंदन गवळी साहेब
  -पी.के. कुलकर्णी
- डिसेंबरचा अंक वेळेपुर्वीच प्रकाशित केल्याबद्दल कौतुक, अंकातील माहिती अद्ययावत, वैशिष्टपूर्ण. अभिनंदन. - विठ्ठल धोकटे
- अतिशय माहितीपूर्ण, विविधतेने नटलेला सर्वांगसुंदर सेवक वार्ता अंक. अभिनंदन गवळी साहेब. - प्रकाश कुकडोलकर
- एडिटिंग करणे ,वृताकन लिहणे त्यातल्या त्यात शब्द रचना अचूक जुळवणे,उपलब्ध स्पॅसिंगमध्ये ते बसवणे, त्यासाठीची होणारी कट छाट करणे ह्या बाबी फक्त बुध्दिमान व्यक्तीलाच जमू शकतात.हे कौशल्याचे काम आहे.तुम्हाला सॅल्युट गवळी सर. - जयप्रकाश पाटील
  वैविध्य विषयावरील माहितीचे संकलन करुन उत्कृष्टरित्या छपाई करुन पुन्हा दर्जेदार अंक प्रसिद्ध केल्याबद्दल श्री गवळी सरांचे अभिनंदन.श्री सावरकर साहेब व श्री पत्की साहेब यांच्या मार्गदर्शना खाली सेवक संघाची घोडदौड जोरात सुरू आहे.जुन्या पिढीतील ग्रामीण भागातील वास्त्यव्य जीवन डोळ्या समोर उभे राहते. श्री उमेश धोपेश्वरवरकर यांचे साहसी सायकलिंग व श्री छल्लारे यांचे वृक्षसंवर्धन कार्य याबाबत दोघांचं अभिनंदन . तसेच श्री पुजारीसाहेब यांच्या खोल मनाच्या तळाशी काव्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.
  -विठ्ठल भावे

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादक - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६